निशाणी क्र. २८

## सरकारतर्फे साक्षीदार क्र. ७ (PW–7) यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – ज्ञानेश्वर पांडुरंग श्रीनाथ

वय – ५४ वर्षे, व्यवसाय – शेतीकाम,

राहणार – नारायणपूर, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा

– – – – –

## सरतपास – सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत

१. सुभद्राबाई माझी पत्नी आहे. त्यांची तब्येत आज खराब असल्याने येऊ शकल्या नाहीत. विष्णू आत्माराम खैरे यांना मी ओळखतो. माझ्या आणि विष्णूच्या घरामध्ये तीन घरे आहेत. आत्माराम खैरे यांना मी ओळखत नाही. विष्णूचे लग्न झाले होते. त्याच्या पत्नीचे नाव मला माहिती नाही. घटना कधीची आहे ते मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की विष्णू हा त्याच्या पत्नीला मारहाण करत असे छळ करत असेल आणि तिचा त्याने खून केला.

(भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ मधील तरतुदीनुसार साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने उलट तपासात विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी शासकीय अभियोक्ता यांच्या विनंतीवरून देण्यात आली.)

२. पोलिसांनी माझ्याकडे विचारपूस केली नव्हती. विष्णू कुठे आहे ते मला माहिती नाही. विष्णूची पत्नी काय करते आणि आता ती आहे का ते मला

माहिती नाही. विष्णूची पत्नी वारली हे म्हणणे बरोबर होईल. ती कशाने वारली ते मला माहिती नाही. तिच्या अंत्यविधीला मी गेलो नाही. मी शेतातून घरी आलो तेव्हा वर्षा बाईला गाडीत घेऊन गेले होते. हे घरी आहे की ते उन्हाळ्याचे दिवस होते आणि मे महिना होता. हे खरे नाही की मे महिन्यात शेतातील कामे दुपारी बारापर्यंतच केली जातात. हे खरे आहे की शेतातील काम करून लोक घरी येतात. हे खरे नाही की घटना घडली त्यावेळी मी घरी हजर होतो.

३. हे खरे नाही की विष्णू खैरे हा त्याची पत्नी वर्षा हिला नेहमी मारहाण करायचा आणि कामावरून घरी आला की तो सुरुवात करून द्यायचा. ते खरे नाही की वर्षाला तो घाण घाण शिवीगाळ करायचा आणि कशाने पण मारून जखमी करायचा. हे खरे नाही की विष्णू खैरे याचे वडील आत्माराम खैरे हे माझे चांगले मित्र आहेत. हे खरे नाही की त्यांच्या दारासमोर मोठे लिंबाचे झाड असल्याने त्या झाडाखाली बसून मी आणि आत्माराम नेहमी गप्पा मारत बसायचो. हे खरे नाही की विष्णू कामावरून घरी आला की वर्षाला विनाकारण मारहाण करायला सुरू करायचा व आत्माराम हे तिला वाचवायला गेले तर त्यांना सुद्धा तो मारहाण करायचा. हे खरे नाही की त्याची मुले मध्ये सोडवायला गेली तर त्यांना सुद्धा उचलून उचलून तो फेकून द्यायचा. हे खरे नाही की असे प्रकार रोजचेच झाले असल्याने त्याची सगळ्यांना सवय झाली होती. हे खरे नाही की आत्माराम खैरे यांना विष्णू पाणी भरायला लावायचा परंतु वर्षाला घराच्या बाहेर निघू देत नव्हता. हे खरे नाही की विष्णू उर्फ पिंटू याने वर्षाचा शेवटपर्यंत भयानक त्रास देऊन अतोनात छळ केला आहे. आता मला वाचून दाखवण्यात आलेला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "अ" हा खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितला नाही. पोलिसांनी तसे का लिहून घेतले ते मला माहित नाही.

४. हे खरे नाही की दिनांक २८/०५/२०२१ रोजी सकाळीच जेव्हा विष्णू उर्फ पिंटू कामावर निघून गेला तेव्हा त्याचे वडील आत्माराम खैरे हे मला भेटले व त्यांनी सांगितले की सकाळीच विष्णूने वर्षाला मारहाण केली आहे व कामावरून घरी आला की पुन्हा तिला मारहाण करेल असे वाटते. हे खरे नाही की मी माझ्या घरीच घरासमोरील अंगणात दुपारी अंदाजे दीडच्या सुमारास विष्णू हा मला कामावरून येताना आणि घराकडे जाताना दिसला. हे खरे नाही की त्याच्या घराचे पाठीमागेच माझे घर असल्याने त्याच्या पत्नीच्या ओरडण्याचा आवाज मला नेहमी यायचा. आता मला वाचून दाखवण्यात आलेला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "ब" हा खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितला नाही. पोलिसांनी तसे का लिहून घेतले ते मला माहित नाही.

५. हे खरे नाही की मी अंगणामध्ये बसलो असताना मला आत्माराम खैरे यांच्या घरातून नेहमीप्रमाणे वर्षा खैरे हिचा ओरडण्याचा आवाज यायला सुरुवात झाली. हे खरे नाही की मला समजले की विष्णू खैरे यांनी आता वर्षाला मारायला सुरुवात केली. हे खरे नाही की वर्षा हिचा अंदाजे दोन तास राहून राहून किरकाळ्या करण्याचा आवाज येत होता. हे खरे नाही की माझ्या घराशेजारील इंदुबाई या वर्षाला सोडवण्याच्या हेतूने विष्णूच्या घरापर्यंत गेल्या. हे खरे नाही की त्यांना नंदाबाई ढगे यांनी सांगितले की त्या मध्यस्थी करण्याकरिता गेल्या होत्या परंतु विष्णू उर्फ पिंटूने त्यांना धक्का देऊन ढकलून दिले आहे. हे खरे नाही की इंदुबाई या सुद्धा मागे फिरल्या व त्यांची काही हिम्मत झाली नाही. हे खरे नाही की ते मी माझ्या डोळ्याने पाहिले आहे. आता मला वाचून दाखवण्यात आलेला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "क" हा खरा नाही. तो मी पोलिसांना

सांगितला नाही. पोलिसांनी तसे का लिहून घेतले ते मला माहित नाही. हे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांनी उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.17 18:02:56 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – १७/०३/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत ११.४८ वाजता सुरु करुन १२.१५ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.17 18:03:01 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – १७/०३/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |